## नियमीत दिवाणी दावा क्र.२९/२०२२

## अर्ज निशाणी–२२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील जबाब वाचला. दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद श्रवण केला.

३. प्रस्तुत अर्जात वादी यांचे थोडक्यात म्हणणे असे की, सदरील दाव्यामध्ये वादी यांनी नमुद केलेला खरेदी दस्त क्र.६८४२/२०२१ चा मोबदला रक्कम रु.१०,००,०००/– (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) असे चुकीने नमुद केलेले असुन सदर खरेदीखताचा मोबदला हा रु.७,२०,०००/– (अक्षरी रुपये सात लाख वीस हजार फक्त) असा बरोबर आहे. सदरील चुक ही त्यांनी जाणूनबुजून न करता हस्तदोषाने झालेली आहे म्हणुन वादीस दाव्यातील परिच्छेद क्र.४, ६ व ११ यामध्ये दावा मिळकतीच्या खरेदीखताचा मोबदला रक्कम रु.१०,००,०००/– (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) ऐवजी रु.७,२०,०००/– (अक्षरी रुपये सात लाख वीस हजार फक्त) असा लिहीण्याची दुरुस्ती करण्याची संमती द्यावी तसेच सदर खरेदीखताची बोलणी करतेवेळी प्रतिवादी क्र.२ यांनी पांडूरंग शंकर सुपेकर, मारुती चिवे, कुलदिप गणपत रगडे, पांडूरंग भोसले, बिपीन यादव व बंटी उर्फ निलेश रांजणे यांच्यासोबत वादी यांना न सांगता दावा मिळकती संदर्भात व्यवहार केलेला आहे म्हणुन दाव्यामधील परिच्छेद क्र.४ मध्ये अर्जातील नमुद कलम ४अ मधील मजकुर समाविष्ट करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन तीव्र आक्षेप नोंदविला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर अर्जातील मागितलेली दुरुस्ती ही मोघम स्वरुपाची असुन त्यास कोणताही आधार नसल्याने सदर दुरुस्ती नामंजुर करण्यास पात्र आहे म्हणुन अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता तसेच कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरील दावा ठराव, मनाई व खरेदीखत रद्द करण्याकरीता दाखल केलेला आहे. सदरील अर्जास वादी यांनी त्यांचे सहाय्यक शपथपत्र निशाणी–२३ अन्वये दाखल केलेले आहे. सदरील अर्जात मागितलेल्या दुरुस्तींचे अवलोकन केले असता सदरील दुरुस्ती ह्या किरकोळ स्वरुपाच्या असुन त्याने दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही असे दिसून येते. तसेच प्रतिवादी यांनी युक्तीवादामध्ये सदरील दुरुस्ती ही किरकोळ असल्याचे म्हणले आहे. त्यामुळे सदरील दावा पुर्ण गुणदोषावर निर्णयीत होण्यासाठी प्रस्तुत अर्जामधील **उपरोक्त नमुद** दुरूस्ती करणे गरजेचे व आवश्यक आहे. तसेच दुरुस्ती मंजुर केल्यास अभय पक्षातील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करणे सोयीचे होईल, त्यामुळे सदरील अर्ज मंजूर करणे न्यायाचे ठरले. कारणे आदेश :–

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादींनी दाव्यात विहीत मुदतीत अर्जात मागितलेली दुरुस्ती अन्वये दाव्यात दुरूस्ती करुन तात्काळ दुरुस्ती दाव्याची प्रत दाखल करावी.

सासवड.
दिनांक : ०३/०४/२०२३.

सही/–XXX
**(श्री. एम. एस. भरड)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.